**पोलीस उप आयुक्त, कार्यालय**
**गुन्हे शाखा, पिंपरी चिचवड.**
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे.

**प्रेसनोट दिनांक ०१/१०/२०२४**

**मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाकडुन रिक्षा चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारास अटक करून, रिक्षा चोरीचे ०५ गुन्हे उघडकीस.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात वाहन चोरीच्या घटना दाखल होत्या. त्याबाबत मा.पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेतील पथके व युनिट यांना वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने मा. संदीप डोईफोडे पोलीस उप आयुक्त गुन्हे, पिंपरी चिचवड मा. डॉ. विशाल हिरे सहा पोलीस आयुक्त गुन्हे, पिपंरी चिचवड यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत मार्गदर्शन केले होते.

मालमत्ता गुन्हे विरोधी पथकातील पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, अधिकारी व अंमलदार हे वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे अनुषंगाने संमातर तपास करीत होते. संमातर तपास करीत असताना पथकातील **सपोफौ खांडे, व पोलीस शिपाई २०५५** रासकर यांना गोपनीय बातमी मिळाली की, देहुगाव परीसरातील एक इसम रिक्षा चोरी करत असुन तो चोरी केलेली रिक्षा शिपने चालविण्यास देत आहे. सदर बातमी नुसार पथकातील अधिकार व अंमलदार यांनी देहुगाव परीसरात शोध घेवुन संशयित इसम नामे अर्थव ऊर्फ यश जयवंत किंगरे, वय २० वर्षे, रा. देहुगांव, पुणे, यास रिक्षा सह ताब्यात घेतले असुन सदर रिक्षा बाबत विचारपुस केली असता सदरची रिक्षा चोरीची असल्याचे आढळुन आले. त्याबबत सदर इसमास अधिक चौकशी कामी ताब्यात घेवुन त्याचे कडे चौकशी करीता त्याने आणखी चार रिक्षा चोरी केल्याची कबुली दिली. त्याबाबत चारही चोरीच्या रिक्षा त्याचे कडुन हस्तगत करण्यात आल्या. सदर हस्तगत चोरीच्या रिक्षांन बाबत तपास करीता नमुद इसमाने सदरच्या पाचही रिक्षा पुणे शहर आयुक्तालय हद्दीतुन चोरी केल्याचे निष्पन्न झाले. सदर रिक्षा बाबत पुणे पोलीस आयुक्तालय येथील पोलीस ठाणे मध्ये खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) समर्थ पोलीस ठाणे गु.र.नं. १८०/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
२) समर्थ पोलीस ठाणे गु.र.नं. १८७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
३) बंडगार्डन पोलीस ठाणे गु.र.नं. २३८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
४) बिबवेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं. २१८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
५)खडक पोलीस ठाणे गुरनं.२६२/२०२३ भा.दं.वि.क.३७९

चौकशी अंती सदर आरोपी हा देहुगाव परीसरात राहुन पुणे शहर हद्दीतुन रिक्षा चोरी करुन सदर रिक्षा या भाडयाने शिपवर देवुन त्याचे भाडे घेत असे असे निष्पन्न झाले. सदर इसमांकडुन आता पर्यत ७,६०,०००/- रु किंमतीच्या ०५ चोरीच्या रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. व सदर आरोपीस पुढील तपास कामी समर्थ पोलीस ठाणे पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो. पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी सो, अपर पोलीस आयुक्त, मा. संदीप डोईफोडे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा. डॉ. विशाल हिरे सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, सहा पोलीस निरीक्षक अभिनय पवार, पोलीस अंमलदार महेश खांडे, औदुबर रोंगे, गणेश हिंगे, सोमनाथ मोरे, नितीन लोखंडे, राहुल खारगे, आशिष बनकर, विशाल गायकवाड, प्रविण कांबळे, नितीन उमरजकर, प्रशांत पाटील, गणेश कोकणे, चंद्रकांत गडदे, समीर रासकर, गणेश सांवत, हर्षद कदम, व सुमित देवकर, यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड

## दरोडा विरोधी पथकांची उल्लेखनीय कामगीरी

## दरोडा विरोधी पथकाकडुन सराईत गुन्हेगारांना अटक करून, चैन चोरीचे ०७ व वाहन चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणुन, ५,३५,०००/- रु. चा मुद्देमाल हस्तगत.

दिनांक २७/०६/२०२४ रोजी दरोडा विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार हे पिपंरी चिचवड आयुक्तालयातील चैन चोरी च्या अनुषंगाने दाखल गुन्हयाचा संमातर तपास करत असताना असंख्य सीसीटीव्ही फुटेज चेक करुन व रेकॉर्ड वरील गुन्हेगारांची माहीती घेत असताना **पोलीस हवा १४५८ बनकर** यांना मिळालेल्या बातमीनुसार व **पोलीस हवा ४७६ खारगे** यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणावरुन सदर संशयित आरोपी हे पिपंरी चिचवड परीसरात वावरत असले बाबत खात्री झाल्याने पथकातील अंमलदार हे पिपंरी चिचवड परीसरात पेट्रोलिंग करत असताना निगडी पोलीस ठाणे हद्दीत दोन संशयित इसम हे MH 12 NG 5308 हेया होंडा शाईन गाडी वर मिळुन आले त्यांना शिताफीने ताब्यात घेतले त्यांची नावे १) दि**पक भगवान जाधव,** वय २६ वर्षे, रा. विक्रम खराबी यांचे खोलीत, कुशल सोनाली सोसायटी समोर, चाकण, पुणे मुळगाव :- मु.पो. पाथरी, ता. जि. जळगाव २) **सचिन साहेबराव पगार**, वय ३१ वर्षे, रा. संतोषीमातानगर, एमआयडीसी सातपुर, नाशिक यांना ताब्यात घेवुन त्याचे ताब्यात मिळालेली मोटार सायकल ही चोरीचे असल्याचे आढळुन आले व आरोपीचे सीसीटीव्ही फुटेज पाहुन त्याचेकडे बारकाईने विचारपुस केली असता त्यांनी हिजंवडी, देहुरोड, भोसरी परीसरात चैन चोरी केल्याचे आढळुन आले. त्याचे कडे चौकशी करता त्यांनी पुढील गुन्हे केल्याचे कबुल केले.

१. हिंजवडी पोलीस ठाणे गुरनं ७५५/२०२४ भादवि कलम ३९४, ३४
२. हिंजवडी पोलीस ठाणे गुरनं ७८२/२०२४ भादवि कलम ३९४, ३४
३. एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुरनं ३०२/२०२४ भादवि कलम ३९४, ३४
४. देहुरोड पोलीस ठाणे गुरनं ३२६/२०२४ भादवि कलम ३९४, ३४
५. भोसरी पोलीस ठाणे गुरनं २८१/२०२४ भादवि कलम ३९२, ३४
६. पिंपरी पोलीस ठाणे गुरनं ४७०/२०२४ भादवि कलम ३९२, ३४
७. पिंपरी पोलीस ठाणे गुरनं ४७६/२०२४ भादवि कलम ३९३, ३४
८. खडकी पोलीस ठाणे गुरनं १६५/२०२४ भादवि कलम ३७९
९. हडपसर पोलीस ठाणे गुरनं ९७९/२०२४ भादवि कलम ३७९

वरील गुन्हयातील चोरीस गेलेला एकुण **०५,३५,०००/- रु चा मुद्देमाल** आरोपी कडुन व त्याचे सहकाऱ्याकडुन हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्याचे वर पुढील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे आढळुन आले आहे.

**१) दिपक भगवान जाधव, वय २६ वर्षे, रा. विक्रम खराबी यांचे खोलीत, कुशल सोनाली सोसायटी समोर, चाकण, पुणे. मुळगाव :- मु.पो. पाथरी, ता. जि. जळगाव.**

१) महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन गुरनं २३७/२०२३ भादवि कलम ४५४, ४५७, ३८०, ४११

**२) सचिन साहेबराव पगार, वय ३१ वर्षे, रा. संतोषीमातानगर, एमआयडीसी सातपुर, नाशिक.**

२) गंगापुर पोलीस स्टेशन गुरनं ६८१/२०१७ भादवि कलम ३९२, ३४
३) गंगापुर पोलीस स्टेशन गुरनं १९२/२०१४ भादवि कलम ३४१
४) अंबाड पोलीस स्टेशन गुरनं ९३/२०१२ भादवि कलम ४५४, ४५७, ३८०
५) गंगापुर पोलीस स्टेशन गुरनं ०२/२०१५ भादवि कलम ३९४, ३३६, ४२७, ५०४, ५०६
६) अंबाड पोलीस स्टेशन गुरनं १३४/२०११ भादवि कलम ३७९, ४११, ३४
७) म्हरूळ पोलीस स्टेशन गुरनं १७१/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
८) गंगापुर पोलीस स्टेशन गुरनं ७०/२०१७ भादवि कलम ३९७, ३६३, ३४
९) गंगापुर पोलीस स्टेशन गुरनं ६८१/२०१७ भादवि कलम ३९२, ३४